# प्रकाशमार्ग

Volume 3 Issue 8 MAY 2011 Rs. 15

## प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९–१९८२)

ऋषींनी शिकवले तसे
आम्ही ध्यान शिकवतो.

### प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

### प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य आहेत. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्तर्षींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेला ध्यानाचा आणि भावनांना व विचारांना सकारात्मक बनविण्याचा एक अद्वितीय मार्ग आहे.

### दृढ वचन

- ★ आपण एकाच दिव्य प्रकाशाचे (परमेश्वराचे) कण आहोत.
- ★ प्रेम हा आपला स्वभाव आहे.
- ★ शांतता ही आपली भाषा आहे
- ★ ध्यान हा आपला मार्ग आहे
- ★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
- ★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
- ★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

## चिंतन

महर्षी कृष्णानंद, अनुवाद : जयंत देशपांडे

अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाला हजारो लोकांनी पाठिंबा दिला. सर्वच व्यवस्थांमध्ये शिरलेल्या भ्रष्टाचारामुळे सर्वजण कंटाळलेले आहेत. आणि याबद्दल काहीच न करू शकल्यामुळे सगळे अगतिक पण आहेत. जेव्हा अण्णा हजारेंनी भ्रष्टाचारा विरुद्ध आवाज उठवला तेव्हा हजारो लोकांनी त्यांच्या मनात दाटलेला राग बाहेर काढला आणि इतर सर्वांनीच त्यांच्या आंदोलनाला मूक सहमती दिली. अण्णा म्हणाले की, भ्रष्टाचाराविरुद्ध त्यांच्या लढ्याची ही सुरुवात आहे. त्यांनी ही लढाई थांबवू नये. जास्त महत्त्वाचे म्हणजे त्यांनी इतर संधीसाधू लोकांना या आंदोलनाचा स्वतःच्या स्वार्थासाठी उपयोग करू देऊ नये किंवा आंदोलनाची दिशा बदलू देऊ नये.

लाखो लोकांनी चॅनल म्हणजेच प्रवाहित केलेल्या शक्ती या आंदोलनापाठीमागे आहेत; ऋषींनी वरील पातळींवरून पृथ्वीवर आणलेल्या शक्ती या आंदोलनापाठीमागे आहेत. त्याचप्रमाणे उदयोन्मुख नवयुगाच्या शक्ती पण आहेत. मिडल–ईस्ट देशांमध्ये जनतेच्या शोषणाविरुद्ध चाललेल्या उठावामागेसुद्धा या शक्ती आहेत. मोठ्या बदलांची वेळ आता आलेली आहे. भ्रष्ट व्यवस्था कोसळण्याला सुरुवात होण्याची वेळ आता आलेली आहे. २०१२ सालात जे बदल होणार आहेत त्यांच्याकडे संकेत दाखवणाऱ्या या घटना आहेत. २०१२ सालात या जगाचा अंत होणार नाही, पण भ्रष्ट व्यवस्थांच्या अंताला सुरुवात होईल.

सर्व ध्यानसाधकांनी जास्तीतजास्त ध्यान करण्याची आणि सर्व लाईट चॅनल्सनी म्हणजेच प्रकाश प्रवाहकांनी जास्तीत जास्त प्रकाश चॅनल करण्याची ही वेळ आहे. या जगाच्या सर्व सभ्य नागरिकांनी सर्व तऱ्हेच्या भ्रष्टाचाराचा, हिंसेचा व निष्प्रेमाचा अस्वीकार करण्याची वेळ आता आली आहे आणि वैश्विक प्रज्ञेकडून न्याय, शांती आणि प्रेम मिळवण्याची वेळ आता आली आहे. सामुदायिक विचारबळात प्रचंड ताकद असते. ते नियतीला बदलते आणि नव्या नियतीचे निर्माण करते. २०१२ पलीकडील नियती निर्माण करण्याची ही वेळ आहे.

---

लोक माझ्याकडे त्यांच्या समस्या घेऊन येतात. मी त्या समस्यांवर पारमार्थिक उपाय सुचवतो. लोक त्यांच्या समस्यांचे निराकरण करतात आणि त्यांचा परमार्थ प्रवास सुरु ठेवतात. जेव्हा लोक परत स्मित करू लागतात तेव्हा मला आनंद होतो. प्रत्येक स्मित माझ्यासाठी सूर्यप्रकाशासारखे आल्हाददायक आहे.

लोक माझ्याकडे इतरांच्या समस्यासुद्धा घेऊन येतात. लोकांनी त्यांच्या समस्या स्वतः ध्यान करायला सुरुवात करून आणि समस्यांवर पारमार्थिक उपाय शोधण्याच्या मार्गांचे अनुसरण करून सोडवायला हव्या, हे समजावून सांगितल्यावर सुद्धा लोकांना ते उमगत नाही. आपल्या समस्या आपल्यालाच सोडवाव्या लागतात. इतर लोक आपल्यासाठी फक्त प्रार्थना करू शकतात. पण लोक सहसा ही गोष्ट समजून घेत नाहीत आणि त्यांना सांगूनही ते पटत नाही. त्यांना चमत्कार हवे असतात. पण ज्याप्रमाणे चमत्कार घडण्यासाठी लोक साकड घालतात, त्या पद्धतीने चमत्कार घडत नसतात. मग लोक ज्योतिषी आणि तांत्रिकांकडे धाव घेतात. ते, आपल्याला जे हवे आहे ते सर्व मिळेल, असे आश्वासन अगदी सहज देतात. अशावेळी लोक पैसा खर्च करतातच आणि सहसा समस्यांचे ओझे तसेच पाठीवर वागवत दुःखीच राहतात.

मला ह्या गोष्टींचे वाईट वाटते आणि मी अशा लोकांसाठी प्रार्थना करतो. ■

मानसा फाउंडेशन (रजि.)
तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर–बागलूर रोड) बंगलोर अर्बन ५६० ०७७. इंडिया.
फोन : (०८०) २८४६५२८०, २२७१५५०१, ९३४२० ३०२५० (सकाळी १० ते दु. ४ पर्यंत)
इ–मेल : info@lightagemasters.com वेबसाईट : www.lightagemasters.com

## ध्यान वर्ग

### तपोनगरात फक्त दर रविवारी भरतो

प्राथमिक पातळी – सकाळी १० वाजता

### बंगलोर शहरातील केंद्रांमधे वर्ग खालीलप्रमाणे भरतात

**दर रविवारी** (सकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर सोमवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर मंगळवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
श्री ऑरोबिंदो कॉम्प्लेक्स, फेज १,
जे.पी. नगर

**दर बुधवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
आर्य समाज, सी.एम.एच. रोड, इंदिरानगर
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम
मारुति मंदिर, विजयनगर

**दर गुरुवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

**दर शुक्रवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
इंडियन हॅरिटेज अकॅडमी, ब्लॉक६,
कोरामंगला

**दर शनिवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम

### आनेकल येथे

**दर सोमवारी** (संध्याकाळी ६ वाजता)


**दर मंगळवारी** (सकाळी ६ वाजता)

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई–मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिला कॉलम वाचावा.

**Doorways (इंग्रजीत) / तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी)**
**वार्षिक वर्गणी रू. २००/–**
**ड्राफ्ट कृपया "मानसा लाइट एज फाउंडेशन" च्या नावाने काढावा.**
**कृपया 'मनी ऑर्डर' ने पैसे पाठवू नये.**

### वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.



**१ फेब्रुवारी २०११ या दिवशी सकाळी घेतलेला तपोवनाचा फोटो – फोटोत दिसणारे ऑर्ब्स (प्रकाशगोल) सूक्ष्म जीवांची उपस्थिती दर्शवतात**

### काही ठळक घडामोडी

- ६–४–२०११ रोजी आयोजित केलेल्या ओरिएंटेशन वर्गात तपोनगर येथे व इंटरनेटवरून प्रत्यक्ष प्रसारणाद्वारे २५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी भाग घेतला.
- २५–४–२०११ रोजी आनेकल येथील आपल्या सप्तर्षी ध्यान केंद्राचा तिसरा वार्षिक दिन साजरा करण्यात आला.
- २२–५–२०११ रोजी तपोनगरात गुरुजींचा वाढदिवस समारंभ साजरा करण्यात येईल. ह्या कार्यक्रमात भाग घेण्यासाठी कृपया १९–५–२०११ पर्यंत आपले नाव नोंदवावे.
- २२–५–२०११ रोजी तपोनगरात होणाऱ्या गुरुजींच्या वाढदिवस समारंभात "Preparing for 2012" ह्या पुस्तकाचा सौ. पूर्णिमा परुळेकर ह्यांनी केलेला मराठी अनुवाद आणि श्रीमती चंपा ह्यांनी केलेला कन्नड भाषेतील अनुवाद प्रकाशित करण्यात येईल.
- "स्पीकिंग ट्री"वर मास्टर्सच्या सूचीत गुरुजींचे नाव आले आहे. त्यांचे ब्लॉग वाचण्यासाठी व व्हीडियो पाहण्यासाठी कृपया www.speakingtree.in या वेबसाइटला भेट द्यावी.

### रविवारच्या प्रसादाचे प्रायोजक

| | |
|---|---|
| दुर्गानंद जी. के. | ०६–३–२०११ |
| रमेश भोसेकर आणि सुधा रवी | १३–३–२०११ |
| विजयकुमार आणि चन्नबासप्पा | २०–३–२०११ |
| विजया के. सोमण आणि नागम्मा ए. | २७–३–२०११ |

**गुरुजींच्या व्याख्यानांच्या DVDs एका विशेष गटाच्या सदस्यांसाठी दर महिन्याला उपलब्ध राहतील. सविस्तर माहितीसाठी कृपया मानसा कार्यालयाशी संपर्क साधावा.**

**रू. २००० देऊन रविवारच्या प्रसादाचे आणि रू. ५००० देऊन वृत्तपत्राचे प्रायोजक आपण होऊ शकता.**

### तपोनगरातील कार्यक्रम

| | |
|---|---|
| दर रविवारी | – व्याख्यान सकाळी ११ ते १२ पर्यंत<br>– विशेष ध्यान आणि प्रकाश प्रवहन, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत |
| रविवार ०८ | – शंबला गटाची बैठक दुपारी २ वाजता |
| रविवार १५ | – 'रा' गटाची बैठक दुपारी २ वाजता |
| मंगळवार १७ | – बुद्ध पौर्णिमे निमित्त विशेष ध्यान, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत |
| रविवार २९ | – अखंड ध्यान सकाळी १० ते दुपारी १ पर्यंत |

### ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०१ | रविवार | शिवरात्री |
| ०३ | मंगळवार | अमावास्या |
| ०६ | शुक्रवार | अक्षय्य तृतीया |
| ११ | बुधवार | शुक्लाष्टमी |
| १२ | गुरुवार | शुक्ल दशमी |
| १७ | मंगळवार | बुद्ध पौर्णिमा |
| १८ | बुधवार | गुरुजींचा वाढदिवस<br>प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ – तिसरा वार्षिक दिन |
| २२ | रविवार | गुरुजींचा वाढदिवस समारंभ |
| २५ | बुधवार | कृष्णाष्टमी |
| ३१ | मंगळवार | शिवरात्री |

### गुरुजींचा वाढदिवस समारंभ
### रविवार, २२ मे २०११

सकाळी ११ वाजता – स्वागत
व्याख्यान
गुरुजींचे व्याख्यान
पुस्तकांचे प्रकाशन
विशेष ध्यान
गुरुजींकडून आशीर्वाद
दुपारी १२.३० वाजता – प्रसाद

**गुरुजींसोबत अनौपचारिक बैठक शनिवार, १४–५–२०११ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत आयोजित करण्यात येईल. ह्यात भाग घेण्याची इच्छा असणाऱ्यांनी मानसा कार्यालयात आपले नाव नोंदवावे.**

## गुरुजी – एक प्रकाश गुरु

श्यामला देवी, अनुवाद : वैशाली जोशी

एका संध्याकाळी मनोवतीतील निसर्गरम्य दृष्याला निर्देशून महर्षी अमर गुरुजींना म्हणाले, "मला येथे एक स्वर्ग बघायचा आहे". महर्षी अमरांच्या कार्यात नुकतेच गुरुजी सहभागी झाले होते. हे शब्द स्वत:च्या हृदयात कोरून गुरुजींनी त्यांच्या गुरुंच्या स्वप्नाला स्वत:चे स्वप्न आणि जीवितकार्य बनवले. सर्व संघर्ष आणि अवहेलनांना खंबीरपणे सामोरे जाऊन त्यांनी ह्या स्वप्नाचा पाठपुरावा केला. आणि १९९३ साली सर्व स्तरांवर म्हणजेच भौतिक, सूक्ष्म आणि कारण स्तरांवर हे कार्य सुरू झाले.

मानसी आध्यात्मिक शक्तींचे क्षेत्र उभारून, त्यानंतर तपोनगरात महाकुंडलिनी शक्तींची स्थापना करून गुरुजींनी ह्या कार्याचा भक्कम पाया घातला. त्यासोबतच त्यांनी द्वितीय शंबला म्हणून तपोनगराचा विकास करण्यास सुरुवात केली आणि ध्यान योगास, जो ऋषींचा मार्ग आहे, क्रमबद्ध केले. अथक परिश्रम करून गुरुजींनी अनेक स्तरांवर कार्य केले. ऋषित्वाच्या अनेक पातळ्यांना मागे टाकून गुरुजी आता एक प्रकाश गुरु झाले आहेत.

मानसा आणि अंतर–मानसा गुरुजींची आवळीजावळी हृदये आहेत. आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी बांधलेले अंतर–मानसातील अभ्यास केंद्र हे तर भूषणच आहे. दोन वर्षांपूर्वी अंतर–वनातील 'रा' मेडिटेशन हॉल च्या खाली महान 'रा' शक्ती स्थापित केल्या गेल्या. ह्या शक्तींचे अवतरण म्हणजे गुरुजींच्या महत्कृत्यांबद्दल प्रेम आणि प्रशंसा व्यक्त करण्यासाठी विश्वातील महान योगी आणि 'रा' देवाकडून गुरुजींना ७० व्या वाढदिवसानिमित्त देण्यात आलेली भेट होती. ह्या महान 'रा' शक्तींमुळे हे स्थान या जगाचे आध्यात्मिक केंद्र बनले आहे.

प्रकाश गुरु, गुरुजींनी २००८ साली प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ सुरू केली. संपूर्ण पृथ्वीवर प्रकाश पसरवण्यासाठी शाळेतील मुलांची माध्यम म्हणून निवड करून, स्वयंसेवकांचा निष्ठावंत गट, ही चळवळ शांतपणे पसरवत आहे.

ह्या कार्याची व्याप्ती वाढते आहे आणि गुरुजी संपूर्ण जगापर्यंत पोहोचत आहेत. कठीण आणि गोंधळात टाकणाऱ्या ह्या काळात प्रकाशच जगाची आशा आहे आणि स्वयं गुरुजी ह्या प्रकाशास संपूर्ण जगाकडे नेत आहेत. ■

## गुरुजी

वैशाली जोशी

महर्षी अमरांनी गुरुजींना दिलेली मनोवतीतील घराची किल्ली, येणाऱ्या कालावधीत क्रमाक्रमाने उलगडणाऱ्या एका दैवी योजनेच्या किल्लीचे प्रतीक होती. आणि भौतिक पातळीवर गुरुजींना ह्या दैवी योजनेचे प्रकटीकरण करण्याची जबाबदारी घ्यावी लागली. आपल्या गुरू व ऋषींविषयी निरपेक्ष भक्ती व परम आदर असल्यामुळे गुरुजी ह्या दैवी इच्छेस शरण गेले, आणि त्यांनी प्रामाणिकपणाने, आज्ञाधारकपणे, निष्ठेने आणि विनयशीलतेने ही दैवी योजना साध्य करण्याच्या दिशेने स्वत:स पूर्णपणे झोकून दिले.

ते देवाचे साधन बनले आणि त्यांनी तपोनगराची निर्मिती केली. चराचर सृष्टी ज्या मुळापासून उदय पावली आहे त्याचे अंतर–मानसा आणि मानसा प्रकटीकरण आहेत, आणि म्हणूनच मुळापासून त्यांचे मूलतत्त्व मिळविणाऱ्या निरनिराळ्या शक्तींना ते स्वाभाविकरीत्या धारण करू शकतात. ही आश्चर्याची गोष्ट नव्हे की सूक्ष्म देहाने प्रवास करणाऱ्यांना ह्या जागेस भेट द्यायला आवडते, दैवी व्यक्तित्वे व ऋषी जेव्हा पृथ्वीवर येतात तेव्हा सर्वप्रथम ह्या जागेस भेट देतात आणि ऋषी येथे वास करतात.

जेव्हा नवीन शक्ती वरून खाली पृथ्वीवर आणल्या जातात तेव्हा गुरुजी या पृथ्वीवरील लोकांच्या वतीने या शक्ती स्वीकारण्याची जबाबदारी घेतात. असे करताना, एका आध्यात्मिक कायद्यामुळे होणाऱ्या नकारात्मक प्रभावाला ते स्वेच्छेने स्वीकारतात. हे सर्व ते स्वत:साठी काही मिळविण्यासाठी नव्हे तर केवळ देव, ऋषी आणि मानवजातीबद्दल असलेल्या त्यांच्या प्रेमामुळे करतात.

अमर्याद समजूतदारपणा, सर्वांना समाविष्ट करणारे असीम निरपेक्ष दैवी प्रेम आणि सर्वांसाठी असीम कृपा बाळगणारे गुरुजी परमेश्वराचे प्रतिनिधीच आहेत. त्यांच्या संपर्कात येणाऱ्या सर्वांच्या जीवनात ते प्रकाश आणतात. तरी त्यांच्या कार्याचे महत्त्व आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू आपण कधीच पूर्णपणे समजू शकणार नाही. ■

## प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ

ही आपल्या अंत:करणाची चळवळ आहे. ह्या जगाला प्रेम व शांतीने परिपूर्ण अशी सुंदर जागा बनविण्यासाठी ही चळवळ आहे. एक अशी चळवळ जिच्यात प्रवचने नाहीत की घोषणा फलक नाहीत. एक अशी चळवळ जिच्यामध्ये प्रकाश उच्च जगातून प्रवाहित करून पृथ्वीतलावर आणणे व पसरवणे एवढेच पुरेसे आहे. प्रकाशाला प्रवाहित करा. मग शब्द जे करू शकत नाहीत ते सर्व तो प्रकाशच करेल.

आपण जेव्हा प्रकाश प्रवाहित करून पसरवतो तेव्हा तो इतरांच्या हृदयांत व घरात प्रवेश करतो आणि त्यांच्या भावना व विचारांत असलेल्या अंध:काराला दूर करतो. त्यामुळे माणसांत परिवर्तन घडते. माणसांमधील परिवर्तनामुळे जगात परिवर्तन घडते आणि ते प्रकाशमय बनते.

हा चर्मचक्षूंना दिसणारा साधा प्रकाश नसून शक्तीच्या गाभ्यापासून येणारा अतिसूक्ष्म प्रकाश आहे. या मूलस्त्रोतातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्व काही आहे: शक्ती, शहाणपण आणि भवितव्य. आणि तो अदृश्यपणे सर्वत्र वास करून आहे.

आपण चॅनलिंग म्हणजे प्रवहन करून ह्या प्रकाशाला पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवूया. रोज सकाळी उठल्यावर आणि रात्री निजण्यापूर्वी ७ मिनिटे आपण हे करून ह्या जगाचे परिवर्तन करूया.

ह्या जागतिक चळवळीची सुरुवात १८–०५–२००८ रोजी तारामंडळीय परिषदेने म्हणजेच सप्तर्षींनी गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत केली.

हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवा.

वेब साईट : www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**ही प्राचीन ऋषींनी दिलेली सात तत्त्वे आहेत ज्यांचे पालन शंबला या पृथ्वीवरील प्रकाशाच्या नगरीत राहाणारे लोक करतात. हे लोक चिरतरुण असून शांती व परिपूर्णतेचे जीवन जगतात.**

१. तुमच्या अंतरंगातील प्रकाशाचा अनुभव घेऊन सभोवताली पसरवा.
२. प्रेमाचा अनुभव घ्या आणि प्रेम सर्वत्र पसरवा.
३. प्रत्येक जीवामध्ये आणि प्रत्येक वस्तूमध्ये जीवनाच्या एकात्मतेचा अनुभव घ्या.
४. दैनंदिन कामे करण्याआधी प्रथम त्यांची मनात उजळणी करा, नंतर हळू आवाजात त्यांचे शब्दांकन करा आणि नंतरच ती कृतीत उतरवा.
५. कोणतेही ध्येय पूर्ण होण्याआधी त्याविषयी कमीत कमी बोलून गुप्ततेचा नियम पाळा.
६. नकारात्मकतांशी लढा देण्यासाठी शरीर, मन आणि बुद्धीला चालना द्या.
७. उच्च आध्यात्मिक ध्येये गाठण्यासाठी स्वत:हून आपल्या लौकिक गरजांची मर्यादा ठरवा.

# गुरुजी उवाच

( गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानातील वेचे)
( संकलन: शोभा राव, अनुवाद: पूर्णिमा परुळेकर )

१३-०३-२०११

एका माणसाला त्याचा मित्र थोड्या अंतरावर एका घोळक्यात दिसला. पण, तो जेव्हा त्या घोळक्याजवळ गेला तेव्हा त्याला त्याचा मित्र सापडला नाही. तो मित्र त्या घोळक्यात सूक्ष्म देहात ओझरत्या क्षणांपुरता होता, कारण तेव्हा तिथे हजर असण्याची त्याची तीव्र इच्छा होती. नेमक्या त्याच क्षणी ह्या माणसाने त्याला पाहिले.

दुसऱ्या एका घटनेत एक माणूस एका प्रश्नाचे उत्तर जाणण्यासाठी खूप अस्वस्थ झाला होता. तो मला भेटू शकत नव्हता. पण त्या रात्री त्याला स्वप्न पडले व स्वप्नात तो मला भेटला. ते स्वप्न त्याला तपशीलवार आठवते. तो सूक्ष्म देहाने माझ्याजवळ आला होता. कोणत्यातरी प्रज्ञेने, कोणत्यातरी प्रक्रियेने त्याला त्याच्या प्रश्नाचे उत्तर जाणण्यात मदत केली. ह्या सर्वामागे त्याची तीव्र इच्छा होती, सबळ हेतू होता. सबळ आणि निर्मळ हेतू असेल तर सर्व काही शक्य होते, जसे की ऋषींसोबत संपर्क साधणे असो की शंबलाला भेट देणे असो.

आपल्या आतल्या आवाजाची आपल्याला जाणीव असायला हवी व आपण तो ओळखायला हवा. आपण अंतःप्रेरणेचा सल्ला घेतला पाहिजे. पण, काहीवेळा अंतःप्रेरणासुद्धा सत्य आपल्यापर्यंत पोहोचवू शकत नाही कारण, ती सत्याचे संपूर्णतः आकलन करू शकत नाही. ही फारच विचित्र गोष्ट आहे की आत्मासुद्धा चुका करतो. अशा वेळी आपण आपल्या सदसद्‌विवेकबुद्धीचा आधार घेतो कारण ती आपल्याला नेहमीच सत्य सांगते. सदसद्‌विवेकबुद्धी काय आहे ते आपण पूर्णपणे जाणलेले नाही. सदसद्‌विवेकबुद्धी ईश्वरी शक्तीशी जोडलेली असते आणि त्यामुळे ती सत्य जाणू शकते. या विषयावर आपण भरपूर संशोधन करायला हवे.

त्याच अनुषंगाने सांगतो की अहम् नकारात्मक नसतो. आपल्याला चुकीचा मार्ग दाखवणे हा त्याचा सहसा हेतू नसतो. आपण त्याला उद्धटपणे वागण्याची मुभा देतो तेव्हा तो फार विचित्र व निराळ्याच तऱ्हेने वागतो. अन्यथा, अहंकार आपला मित्र असतो.

आपल्याला आज आपल्या पूर्वायुष्यातील काय आठवते ते आपल्या इथल्या गरजांवर, आपण कशाचा अभ्यास करतो आहोत त्यावर अवलंबून असते. उदा. संगीतज्ञ. जर कोणी माणूस पूर्वजन्मात संगीतज्ञ असेल आणि जर त्याने या जन्मात परत संगीताची कास धरली, तर पूर्वजन्मी मिळविलेले ज्ञान त्याला या जन्मी आठवते. अन्यथा ते जन्मानुजन्म निद्रिस्त स्थितीत राहते. जर अनेक जन्मांनंतर त्याने परत संगीताची कास धरली तर ते ज्ञान निद्रिस्त स्थितीतून बाहेर येते व त्याला प्राप्त होते. ह्या प्रक्रिया समजून घेणे अवघड आहे.

जपानमध्ये नुकतीच झालेली शोकांतिका अनेक घटकांच्या संयोगामुळे घडली. प्रलयाचा थोडा भाग, २०१२ च्या दिशेने नेणाऱ्या प्रक्रिया आणि इतर अनेक अज्ञात कारणे त्या घटनेला कारणीभूत झाली. केवळ जपानी लोकच नव्हेत तर आपल्यापैकी प्रत्येकजण त्या घटनेने ग्रस्त झाला आहे. व्यक्ती म्हणून, ध्यानसाधक म्हणून आपण जी सर्वोत्तम गोष्ट करू शकतो ती म्हणजे तिथे प्रकाश पाठविणे. लिबियामध्येसुद्धा पुष्कळ प्रकाश पाठविण्याची गरज आहे. आपण जपानकडे आणि लिबियाकडेही प्रकाश प्रवाहित करूया.

२०-०३-२०११

ध्यानामध्ये एका व्यक्तीने मला तपोनगरात प्रचंड प्रकाशाच्या रूपात पाहिले. ती एक कण बनून त्या प्रकाशात विलीन झाली. आपण जेव्हाजेव्हा ऋषींचा अथवा प्रकाशाच्या सागराचा अनुभव घेण्याचा प्रयत्न करतो तेव्हा आपण लहान कण बनून जातो. विनम्रता सर्वात महत्त्वाची आहे. माझ्या मानवी रूपाच्या पलीकडे मी अपरिमित प्रकाश, प्रेम आणि ज्ञान धारण करतो, जे मी तुमच्यासोबत वाटले आहे. बऱ्याच ज्ञानाचा मला अजून उलगडा व्हायचा आहे. माझ्यापाशी माझे शहाणपण आहे व मी सदैव ऋषींच्या संपर्कात असतो. यापैकी कोणत्याही पैलूशी लोक जाणीवपूर्वक संलग्न होऊ शकतात व त्यांना हवी ती मदत मिळवू शकतात.

एका माणसाने मला लिहिले की त्याला तपोनगर प्रकाशाने भरलेले दिसले पण, तपोनगराच्या सभोवती अंधार होता. हे युग प्रकाशाचे आहे, प्रकाशासाठी आहे. आपण प्रकाश पसरवतो. सृष्टीमध्ये भरपूर प्रेम व भरपूर प्रकाश आहे. आपण हे सर्व अजून पूर्णांशाने अनुभवत नाही आहोत. हे प्रेम ऋषींचे प्रेम आहे.

आपण नातेसंबंधात योग्य अंतर राखतो व माणसाच्या सकारात्मक पैलूशी संलग्न होतो तेव्हा त्या नात्यात सुंदरता असते. कशी कोण जाणे, पण आपण मानवी नात्यांची मजा घेण्याची कला हरवून बसलो आहोत. आपण जेव्हा इतरांशी संबंध ठेवतो तेव्हा ध्यानात अनुभवलेल्या व्यापकतेची प्रचीती दिली पाहिजे. जर आपण तसे केले नाही तर पुन्हा ध्यानामध्ये व्यापकतेचा अनुभव घेणे आपल्याला शक्य होणार नाही. अंतर्गत व्यापकता व बाह्य व्यापकता परस्परांशी जोडलेल्या असतात. सदासर्वदा व्यापकता प्रकट करणे हीच परमार्थनिष्ठा आहे.

ध्यान केल्याने जीवनातील सर्व स्तरांवर निःसंदिग्धता येते. ह्या मार्गातील साधक ऋषींशी जोडलेले असल्यामुळे चुका करू शकत नाहीत. जर आपण काही चुका केल्याच असतील तर पुन्हा तसे न घडण्यासाठी आपण सावधान होऊ शकतो आणि ध्यानापासून झालेल्या सर्व लाभांचा उपयोग करू शकतो.

आपल्यापैकी बहुतांश लोकांनी अनुभव घेतला आहे की ध्यानात कधीकधी काळाची गती बदलते.

ध्यान करत असताना काळामध्ये प्रवास करणे शक्य असते. अर्थात्, त्यासाठी प्रशिक्षण व थोड्या जास्त तंत्रांच्या अभ्यासाची गरज असते.

जर ध्यानाचा हेतू सुस्पष्ट व निःसंदिग्ध असेल तर आपण योग्य मार्गावर पोहोचू शकतो.

२०१२ साठी तयारी करण्याच्या दृष्टीने ऋषींकडून मिळालेल्या दोन स्पष्ट सूचना अशा आहेत: मनाचा निश्चय करून तुमच्या शरीरयंत्रणेमधून नकारात्मकता निपटून टाका. सदैव प्रकाश धारण करा.

पृथ्वी, निसर्ग, प्राणी, झाडे, पक्षी या सर्वांनी सर्व नवीन ऊर्जा सहजपणे ग्रहण करून शोषून घेतल्या आहेत व ते नवयुगात प्रवेश करण्याची वाट पाहत आहेत. परंतु, सर्व नसली तरी पुष्कळ माणसे या ऊर्जा नाकारत आहेत. २०१२ सालातील घटनांच्या परिणामांचे निरीक्षण केल्यानंतर ऋषी नियमितपणे अभ्यास करून संक्रमणाच्या काळाबद्दल योग्य तो निर्णय घेतील. प्रलयाच्या सर्व प्रक्रिया २०१६ किंवा २०१८ पर्यंत संपाव्या असे आम्हाला वाटते. इथून पुढे, प्रलयाच्या प्रक्रियांचा वेग वाढेल.

'होळी' हा 'कामदहन' करण्याचा दिवस आहे. आपण कल्पना करतो की आपल्या पुढ्यात अग्नी आहे जो भगवान शिवाच्या शक्तीचे रूप आहे आणि आपल्या सर्व नकारात्मकता त्या अग्नीत जाळून भस्म करून टाकतो. हे तुम्ही कोणत्याही दिवशी करू शकता, परंतु पौर्णिमेच्या दिवशी केले तर ते अधिक परिणामकारक ठरते. तुम्ही भगवान शिवाची प्रार्थना करून कल्पना करू शकता की त्यांच्याकडून शक्ती येत असून त्या तुमच्या शरीरयंत्रणेला भरून टाकत आहेत. त्या

## गुरुजी उवाच

( गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानातील वेचे)
( संकलन: शोभा राव, अनुवाद: पूर्णिमा परुळेकर )

आपल्या नकारात्मकतांचे दहन करून आपल्याला शुद्ध करतात.

जेव्हा काही लोकांनी मला सांगितले की टी.व्ही. वर कोणत्यातरी ज्योतिषांनी दिलेल्या सल्ल्यानुसार त्यांनी मोठ्या चंद्राकडे नुसते पाहूसुद्धा नये असे त्यांना वाटले, तेव्हा मला मोठा धक्का बसला. ते केवढे प्रेक्षणीय दृश्य होते! आणि मला कळत नाही, कोणत्या आधारावर अशा गोष्टी सांगितल्या जातात! पण दुःखद भाग हा आहे की अशा गोष्टी गांभीर्याने घेतल्या जातात.

वैयक्तिक पातळीवर प्रशिक्षण देण्याची आता वेळ आली आहे. तुम्ही काही साध्य करून जर विशिष्ट पायरीशी पोचला असाल तर माझ्यापाशी या. तुमच्या अंतःप्रेरणेचा, तुमच्या सदसद्विवेकबुद्धीचा हवाला घ्या. मला काही विशिष्ट गोष्टी तुमच्याकडे सोपवायच्या आहेत. आपल्याला परिवर्तनाची तयारी करायची आहे. २०१२ ची तयारी करण्यापेक्षाही आजचे जगणे फार महत्त्वाचे आहे.

२७-०३-२०११

ध्यानाचे मुख्य कार्य आपल्या जाणिवेला विश्वचेतनेच्या महासागरापर्यंत नेणे हे आहे. हे तेव्हा घडते जेव्हा आपली शरीरयंत्रणा शांत झालेली असते. त्यावेळेस आपण समाधीचा अनुभव घेण्यास सुरवात करतो. जेव्हा आपण प्रत्येक बाबतीत शुद्ध असतो तेव्हाच चेतनेचे उत्थान घडते अन्यथा, त्या मार्गात अडथळे येतात.

प्रयत्न आणि अपयश ही ह्या पृथ्वीची वैशिष्ट्ये आहेत. जेव्हा आपण संघर्ष करत असतो तेव्हाच आपण आपले संपूर्ण व्यक्तित्व पणाला लावतो. अन्यथा, आपण सुस्त व निष्क्रिय असतो. अपयश आल्यावर आपण पुन्हा नव्या जोमाने कामाला लागतो. जेव्हा आपले ईप्सित साध्य होते तेव्हा आपल्या आनंदाला पारावार राहत नाही, आपण उत्साहाने ओसंडून जातो. हे या पृथ्वीवरचे अपूर्व अनुभव होत. हे सत्य आहे की असे अनुभव घेण्यासाठी इतर ग्रहांवरचे लोक इथे जन्म घेत असतात.

ध्यानसाधना करायला लागल्यानंतर काही महिन्यांतच आपल्याला शांती लाभते. ह्या शांतीला आपण स्थिरावू दिले पाहिजे. त्यानंतरच, आपल्या गरजांविषयीचे आपले आकलन व आपले उद्देश स्पष्ट होतील. अन्यथा, आपण सदोदित संभ्रमात राहू व आपल्या उद्देशांपासून दूर भरकटू.

ध्यानामुळे आपले प्राधान्यक्रम स्पष्ट होतात. संबंध कसे ठेवावे, किती ठेवावे, नात्याचे महत्त्व काय, नात्याची किंमत काय, आपले खरे नातेवाईक कोण इ. प्रत्येक गोष्ट स्पष्ट होते. पण, कधीकधी आपण या गोष्टींपासून दूर जातो व आपली आध्यात्मिक ध्येये विसरतो.

पुष्कळदा, आपण साधना सुरू केल्यावर आपले ऐहिक प्रश्न सुटतात. आपण साधनेवर लक्ष केंद्रित करावे म्हणून ऋषी आपल्याला हे फायदे देतात. पण बरेचदा हे ऐहिक फायदे मिळाल्यावर आपण फक्त भोगवादाच्या पाठी लागतो आणि साधना विसरून जातो. त्यावेळी समस्या आपल्यासमोर पुन्हा उभ्या ठाकतात. यावर माझ्याजवळ सोपा उपाय आहे. तो म्हणजे ध्यानाला सुरवात करा, तुमच्या समस्या नाहीशा होतील. हे करून पाहा व अनुभव घ्या.

एकदा आध्यात्मिक ध्येय निवडल्यावर आपण सावध असायला हवे व लक्ष केंद्रित करून त्याचा व्यवस्थित पाठपुरावा करायला हवा. आपल्या सर्व वैयक्तिक इच्छा, आकांक्षा, वैयक्तिक कार्यक्रमसूची आपल्या आध्यात्मिक ध्येयाशी सुसंगत असायला हव्या. अशा तऱ्हेची सुसंगती नसते तेव्हा स्वाभाविकपणेच साधनेत व्यत्यय येतात. आपली प्रगती खुंटते. आपण साधनेच्या मार्गावरून भरकटतो. आध्यात्मिक ध्येय स्वीकारल्यानंतर, जर आपण आपले इतर छंद, अभ्यास, नाद सोडून दिले तर अगदी थोड्याच वेळात आपण आध्यात्मिक ध्येये गाठू शकू. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्याला आपला अहंकार सोडायला हवा. आपल्याला आपल्या आसक्ती सोडायला हव्यात. आपल्याला फक्त आपले ध्येय, ऋषी आणि ईश्वरावर आसक्ती ठेवायला हवी.

विश्वामित्र महर्षींनी पहिल्या शंबला तत्त्वाच्या संदर्भात ज्या विशेष सूचना दिल्या आहेत त्यातील एक अशी आहे: आपण स्वतःला सुंदर ठेवले पाहिजे, आपल्या सभोवताली असलेली प्रत्येक वस्तू सुंदर ठेवली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीत, प्रत्येक जागेत, प्रत्येक व्यवस्थेत एक ताल आहे, एक समतोल आहे. आपण तो पाहावा; त्याला धक्का लावू नये किंवा त्याला बदलण्याचा वा सुधारण्याचा प्रयत्न करू नये. हे विशेषकरून निसर्गाला लागू होते.

केव्हाकेव्हा, जुन्या गोष्टी मानाव्या की ऋषींनी दिलेल्या नवीन संकल्पनांनुसार चालावे ते समजून घ्यायला लोकांना फार प्रयास पडतात. ते, 'हे करावे की ते' अशा कात्रीत सापडतात. अशा वेळेस तुमच्या अंतःप्रेरणेवर विसंबा. सत्याचा मागोवा घ्या. तुम्ही एकच गोष्ट, एकच मार्ग निवडू शकता.

एका व्यक्तीने मला लिहिले की तिने अन्नग्रहण कमी केले आहे. आध्यात्मिक हेतुसाठी तुम्ही उपाशी राहायची गरज नाही. ऋषींनी आपल्याला भरपूर ज्ञान दिले आहे. या ज्ञानाचा उपयोग करा.

एका माणसाने लिहिले, "मी विचार करतो की मी अजून साक्षात्कारापासून, ईश्वरापासून किती दूर आहे?" आपण असे निराश होऊ नये. तुम्ही योग्य मार्गावर असाल, योग्य प्रयत्न करत असाल तर हे अंतर कमी होते. तुमचे आध्यात्मिक ध्येय तुम्ही लवकरच, ह्याच जीवनकालात गाठाल. माझे गुरु परमार्थनिष्ठेला 'पिपिलिका मार्ग' म्हणत. संस्कृतमध्ये पिपिलिका म्हणजे मुंगी. माझ्या गुरुंनी मुंगी झाडाच्या सर्वोच्च टोकापर्यंत पोहोचण्यासाठी कसे प्रयत्न करते ते स्पष्ट करून सांगितले. मुंगी झाडावर वरवर चढत असताना एका फांदीमध्ये हरवून जाते. समोर अनेक पर्यायी मार्ग असतात. त्यातील बरेचसे मार्ग झाडाच्या शेंड्याकडे न नेणारे असतात. अशा वेळी स्वतः स्वतःचा गुरु बनावे लागते. स्वतःला सावरा. प्रश्न विचारा. ध्यान करा व प्रकाश जवळ बाळगा. सर्व शंबला तत्त्वे पाळा.

गेल्या वेळी मी व्यक्तिगत प्रशिक्षणाविषयी बोललो. तुम्ही काही आध्यात्मिक प्रगती केली असेल तर माझ्याकडे या. कोणालाही, बाहेरगावातील साधकांनासुद्धा ही संधी आहे. पण, जेव्हा तुम्ही खरोखरीच शांतीसारखे काहीतरी विशेष साध्य केले असेल तेव्हाच माझ्याकडे या. छोटेमोठे अनुभव घेऊन माझ्याकडे येऊ नका.

काही आध्यात्मिक नेतेमंडळी, आध्यात्मिक गुरु राजकारणात प्रवेश करत आहेत. त्यांच्याविषयी काही प्रश्न होते. ही माझी वैयक्तिक धारणा आहे की गुरु हा मार्गदर्शक असतो. उदा. तुमची तयारी असते तेव्हा मी मार्गदर्शन करतो. तुमची तयारी नसेल तर मी वाट पाहतो. मी केवळ सत्य, ऋषी व ऋषींकडून मिळालेले ज्ञान तुम्हाला देऊ शकतो. भरपूर ऊर्जा पृथ्वीवर आणून पसरवायच्या आहेत. त्यांनी मानवी हृदयांत प्रवेश करणे गरजेचे आहे. त्यानंतर आपण परिवर्तनाची अपेक्षा करू शकतो. त्यासाठी दीर्घ कालावधी आणि अपार कष्ट लागतील. आध्यात्मिक क्षेत्रात करण्यासाठी एवढे प्रचंड काम असताना राजकीय भूमिका घेणे कितपत शहाणपणाचे आहे ते मला माहीत नाही. ■

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्ष ध्यानवर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा ई–मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क १००० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क ७०० रू. आहे.

वार्षिक शुल्कात पाठ्यपुस्तकांची किंमत आणि आमच्या कुठल्याही एका भाषेतील मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- ★ सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ–मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ★ ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- ★ सगळ्या शंका आणि प्रश्नांची उत्तरं गुरुजी स्वतः देतात.
- ★ मराठीत लिहिलेल्या पत्रांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- ★ मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- ★ साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

**चेक/ड्राफ्ट "Manasa Light Age Foundation Bangalore" च्या नावाने काढावा. बाहेरगावचे चेक असल्यास रू. ५० अधिक जोडावे.**

## गुरुजींकडून विशेष सूचना

- ★ विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- ★ प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- ★ प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ★ ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ★ ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## श्री जयंत यांच्या भाषणातील वेचे (गुरुजी संबंधी)

संकलन : शोभा राव, अनुवाद : एकनाथ कुलकर्णी

काही दिवसांपूर्वी गुरुजी म्हणाले,'बोलण्यातील आणि लोकांमधील माझे स्वारस्य आता कमी होत चालले आहे.'

गुरुजींनी आपल्या सर्वांसाठी बरेच काही केले आहे. काही जणांसाठी वैयक्तिकरीत्या आणि इतर अनेकांसाठी वेगळ्या मार्गाने – आध्यात्मिक पातळीवर. त्यांनी आपणा सर्वांना खूप प्रेम दिले आहे. गुरुजी अगदी मनापासून कळकळीने बोलले आहेत. त्यांच्या ध्यानवर्गातून, खाजगी चर्चेतून, अनौपचारिक बैठकींतून, मासिक पत्रिकेतून आणि त्यांच्या पुस्तकांमधून ते कळकळीने बोलले आहेत.

त्यापैकी किती आपण समजू शकलो, आचरणात आणू शकलो? त्यापैकी किती गोष्टी आपण आपल्या हृदयात कोरून ठेवल्या आहेत? गुरुजींचे ऐकल्यानंतर आपण कितपत त्याला प्रतिसाद दिला आहे आणि कोणत्याप्रकारे प्रतिसाद दिला आहे? अशी सर्व प्रश्ने आपल्याकडे रोखून पाहत आहेत. आपण त्यांचे नैराश्य दूर करू शकतो का? की त्याला खूप उशीर झाला आहे? अर्थात गुरु नेहमीच वाट पाहतात. त्यांच्याकडे अतोनात धीर असतो. या प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी जर आपण स्वतःला तयार करू शकलो नाही तर ती एक शोकांतिका ठरेल.

गुरुजींचे आयुष्य हे एक 'तप' आहे. त्यांचे आयुष्य म्हणजे स्वतः जळून इतरांना प्रकाश देणे आहे. केवळ आपल्यालाच नव्हे तर सर्व जगाला प्रकाश देण्यासाठी ते जळत आहेत. आपल्या मार्गाचे लक्ष व्यक्तिविशेषावर आहे. कोणतीही क्रांती एका व्यक्ती पासूनच सुरू होते. गुरुजीं सारखी एकच व्यक्ती आपल्या आयुष्यामध्ये इतका बदल घडवून आणू शकते. त्यांच्या प्रेमावर हा मार्ग उभा आहे. इथल्या वास्तू, इथले वृक्ष, झाडे–झुडूपे, येथील अनेक शक्ती जिवंत आहेत, प्रेमाने ओतप्रोत भरलेल्या आहेत. येथील शक्तींचे गुरुजींशी एक विशेष नाते आहे. गुरुजींशी असलेल्या या विशेष नात्यामुळे या शक्तींचे वास्तव्य इथे आहे. जागतिक कार्यासाठी त्या इथे वास करतात. या शक्ती वैयक्तिक पातळीवर तसेच जागतिक स्तरावर नियती बदलणाऱ्या व नवीन नियती घडवणाऱ्या आहेत.

या शक्ती अशातशाच अवतरत नाहीत. मानवतेच्या वतीने कोणीतरी त्यांचा स्वीकार करण्याची जबाबदारी घ्यावी लागते. गुरुजींनी ही जबाबदारी घेतली आहे. गुरुजींसारखे महापुरुष अशा प्रकारे बदल घडवून आणू शकतात. त्यांच्या शिवाय महान 'रा'च्या शक्ती आपल्याला उपलब्ध होऊ शकल्या नसत्या. मानवी शरीरात या पृथ्वीवर गुरुजींचे वास्तव्य या क्षणी अतिशय महत्त्वाचे आहे. ■

## मार्गदर्शक प्रकाश

मनोज चोप्रा, अनुवाद : पूर्वा फडके

अनेक वर्षांपूर्वी मी जेव्हा गुरुजींना पहिल्यांदा भेटलो, तेव्हा मला त्यांच्यात काहीतरी खास जाणवले. हळूहळू ते एक महान व्यक्ती असल्याचे मला समजले. इतका साधेपणा असलेली, शिष्टसंमत व्यवहार करणारी, चमकदार डोळे असलेली व चेहऱ्यावर दैवी हास्य विलसणारी व्यक्ती मला गुरू म्हणून लाभेल याची मला कल्पनाही नव्हती. मला माझे गुरु इतक्या सहजपणे भेटतील याची मला कल्पनाही नव्हती. त्यांना भेटल्यावर माझं व्यक्तित्व त्यांच्यात विरघळून जाऊ लागलं व नव्याने आकार घेऊ लागलं.

एखाद्याला मार्गदर्शन करण्याची त्यांची कळकळ व प्रामाणिकपणा याकडे मी सर्वात जास्त आकर्षित झालो. अंधाऱ्या रात्रीतील तेजस्वी ताऱ्याप्रमाणे ते माझ्या आयुष्यात आले. मी त्यांना भेटलो नसतो तर माझं आयुष्य अपूर्ण व हेतूशून्य राहिलं असतं. जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये विविध क्षमता असणाऱ्या शेकडो माणसांना मी भेटलो. पण या महान व्यक्तिमत्त्वाच्या तोडीचे दुसरे कोणीही मी पाहिलेले नाही.

एकदा त्यांच्याशी बोलताना त्यांच्या मानवी भागामागील प्रकाशाचा सागर मी अनुभवला. त्यांचे मानवी रूप प्रतीकात्मक आहे. वास्तविक गुरुजी प्रकाशच आहेत. त्यांचे एक स्मितहास्य माझ्यासाठी या आयुष्यातून सुखरूप पार पडण्यासाठी पुरेसे आहे. ■

## गुरुजी

रामचंद्र के., अनुवाद : पूर्वा फडके

या संभ्रमात टाकणाऱ्या व वाढत्या अंदाधुंदीच्या काळात खरा गुरु शोधणे आणि प्रकाशाच्या मार्गावर पाऊले टाकणे ही सोपी गोष्ट नाही. अशावेळी एका आध्यात्मिक गुरुची गरज असते ज्याला आपल्या बांधवांबद्दल आणि सर्व जीवांबद्दल खरी कळकळ आहे, ज्याचा उच्चस्तरीय जीवांशी संपर्क आहे, ज्याच्यासाठी उच्चस्तरीय ज्ञानाचा मार्ग खुला आहे, ज्याने स्वत: आयुष्यात वेदना व कठीण क्षण झेलले आहेत, जो दूरवरच्या गोष्टी पाहू शकतो आणि मानवतेला पुढे जाण्यासाठी मार्गदर्शन करू शकतो.

गुरुजींनी हे सर्व अनुभवल्यानंतर, महर्षी अमरांसारख्या प्रगत गुरुंना भेटल्यानंतर, सप्तर्षींशी संपर्क प्रस्थापित केल्यानंतर आपल्याला मार्गदर्शन करण्याचे मोठे आव्हान स्वीकारले आणि पूर्वग्रह नसलेले एक आधुनिक गुरु आपल्याला मिळाले ज्यांनी मानवतेला प्रकाशाच्या मार्गावर नेण्यासाठी मार्गदर्शन केले.

त्यांच्या पाऊलखुणा आपल्यासाठी मशालीच्या प्रकाशाप्रमाणे आहेत, त्यांची शिकवणच आपलं ध्येय आहे आणि त्यांचे आयुष्यच आपले मार्गदर्शक आहे. या प्रकाशाने, म्हणजेच गुरुजींनी आपल्याबरोबर सदैव राहावे व आपण त्यांच्यासोबत सदैव राहावे. ■

## प्रश्नोत्तरे

संकलन: शोभा राव, अनुवाद: सुनिता देशपांडे

**प्र. दीक्षा म्हणजे काय?**

उ. आरंभी, दीक्षा म्हणजे दीक्षा घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीचा सत्यशोधक म्हणून स्वीकार करणे होय. त्यानंतर फक्त तत्त्वांचा बौद्धिक अभ्यासच नाही तर आध्यात्मिक सरावांच्या जगाशी त्याची ओळख करून देणे होय. शक्ती ग्रहण करण्यासाठी त्याला तयार करणे होय. दीक्षा ही अतिशय पवित्र आणि गंभीर प्रक्रिया आहे. साधारणतः ऋषी त्यांनी गोळा केलेल्या शक्तींच्या साठ्यातून साधकाला शक्ती देत असतात. ते साधकाची संपूर्ण शरीर यंत्रणा आध्यात्मिक साधनेसाठी तयार करतात आणि काही विशिष्ट प्रक्रियांना कार्यान्वित करतात.

**प्र. दीक्षेच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत का?**

उ. एकच पद्धत आहे. साधकाला शक्ती ग्रहण करण्यासाठी तयार करण्याचे मात्र बरेच मार्ग आहेत.

**प्र. पूर्ती म्हणजे काय?**

उ. जेव्हा एखादा माणूस काहीतरी मिळवतो, तेव्हा तो त्याची इच्छापूर्ती किंवा लक्ष्यपूर्ती करतो. मग ते लक्ष्य कोणतेही असो.

**प्र. चमत्कारांच्या अनुभवाची आध्यात्मिक प्रगतीमध्ये मदत होते का?**

उ. प्रत्यक्षपणे नाही. तुम्हाला जर एखाद्या चमत्काराचा अनुभव आला तर त्या चमत्काराला समजण्याचा प्रयत्न करा. कोणी एखाद्या चमत्काराचा अनुभव घेऊन रोमांचित होईल. त्याबद्दल लोकांशी बोलेल पण कदाचित आध्यात्मिक प्रगती करणार नाही. चमत्कार ही एक सुरुवात असते. पण आपण जर आध्यात्मिक प्रवास सुरू केला नाही तर आपण कधीच प्रगती करू शकणार नाही.

**प्र. आपण झोपलेले असताना आपला आत्मा काय करत असतो?**

उ. त्यावेळी साधारणतः आपला आत्मासुद्धा संपूर्ण शरीरयंत्रणेसोबत आराम करतो. कधी कधी तो सूक्ष्मशरीरातून प्रवास करतो. आणि कधी कधी तो देवत्वाशी संपर्क साधून समाधीचा अनुभव घेत असतो.

**प्र. आध्यात्मिकता एखाद्या गरीब माणसाची काय मदत करू शकते?**

उ. आध्यात्मिकता गरीब माणसामध्ये आशा जागवते. ती त्याला देवावर विश्वास ठेवण्यात मदत करते. ती त्याला ईश्वरी तत्त्वाच्या जवळ घेऊन जाते. तो त्याचे जीवन शांतीने जगू शकतो.

**प्र. भावना क्षणिक असतात का?**

उ. त्यांची तीव्रता क्षणिक असते. पण भावना आपल्या सोबत राहतात. बऱ्याच वर्षांनंतरसुद्धा आपण आपल्या भावनांना आठवून त्यांना अनुभवू शकतो.

**प्र. भावनिक बुद्धिमत्ता म्हणजे काय?**

उ. भावनांमध्ये शक्ती असते. शक्तींजवळ बुद्धिमत्ता असते. यालाच भावनिक बुद्धिमत्ता म्हणतात. आपण आपल्या जाणिवेचा विस्तार करून भावनिक बुद्धिमत्तेला जाणण्याचा प्रयत्न करायला हवा. मग आपण कधीच चुका करणार नाही आणि योग्यप्रकारे आपल्या भावना व्यक्त करू शकू.

**प्र. इच्छा असणे चुकीचे आहे का?**

उ. नाही. पण आपण फक्त लौकिक इच्छांच्याच पूर्तीसाठी प्रयत्न करू नये. असे केल्याने आपण आपल्या आध्यात्मिक इच्छांकडे दुर्लक्ष करू. जेव्हा आपण आपल्या आध्यात्मिक इच्छेला जास्त महत्त्व देऊ तेव्हा आपण अंततः आपल्या मुक्तीच्या, आपल्या मूळ घरी परतण्याच्या लक्ष्यापर्यंत पोचू.

**प्र. जेव्हा माझ्या इच्छांची पूर्ती होत नाही तेव्हा मी काय करावे?**

उ. तुमच्या अंतःप्रेरणेला विचारा की, तुमच्या या इच्छा योग्य आहेत का. जर त्या योग्य इच्छा नसतील तर त्यांचा त्याग करून योग्य इच्छांची निवड करा. आणि जर का तुमच्या इच्छा योग्य असतील तर इच्छापूर्तीसाठी तुम्ही जास्त प्रयत्न करायला हवेत.

**प्र. आपण आसक्ती आणि विरक्ती या दोन्ही तत्त्वांचे एकाचवेळी आचरण करू शकतो का?**

उ. होय. ते आपल्यावर अवलंबून आहे. आपण परमेश्वरावर, ऋषींवर आणि आध्यात्मिक कार्यावर आसक्ती ठेवू शकतो. त्याचवेळी आपण जगाला एका सुरक्षित अंतरावर ठेवून त्याच्यापासून विरक्त राहू शकतो. आपण वाईट सवयी आणि आरामावर आसक्त होऊ नये.

**प्र. जीवन कोणता सर्वात महान बोध आपल्याला देते?**

उ. प्रेम! प्रेम ही सृष्टीतील सर्वात महान शक्ती आहे आणि सृष्टीमागील सर्वात महान शक्ती आहे. प्रेमाला कोणी शत्रू नसतो. प्रेम सर्वांना जिंकून घेते. प्रेम आपल्याला सर्वकाही मिळवून देते. प्रेमासोबत आपण परिपूर्ण जीवन जगू शकतो. ■


## आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| New Age Realities | 200/- |
| 2012 - End or Beginning | 100/- |
| Preparing for 2012 | 100/- |
| iGuruji - Vol 1 | 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| iGuruji - Vol 3 | 150/- |
| iGuruji - Vol 4 | 150/- |
| Higher Communication & Other Realities | 100/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| How to Meditate | 50/- |
| Dhyana Yoga | 50/- |
| Descent of Soul | 50/- |
| Practising Shambala Principles | 50/- |
| Astral Ventures of A Modern Rishi | 50/- |
| Channelled Knowledge from the Rishis | 250/- |
| Channelled Knowledge from the Rishis Vol-2 | 150/- |
| Guruji Speaks Part - I | 200/- |
| Guruji Speaks Part - II | 200/- |
| Guruji Speaks Vol - 3 | 150/- |
| The Book of Reflections - Vol 1 | 200/- |
| The Book of Reflections - Vol 2 | 200/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences | 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| ऋषींकडून मिळालेले ज्ञान (Marathi) | 200/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| २०१२ – अंत की आरंभ? (Marathi) | 100/- |
| आयगुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्त्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| प्रकाश (Marathi) | 10/- |
| उच्चस्तरीय संवाद आणि इतर सत्ये (Marathi) | 100/- |
| ध्यान कैसे करे (Hindi) | 50/- |
| ध्यान-योग (Hindi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |

### ही पुस्तके खालील ठिकाणी मिळतील:

**मुंबई:** चेतना बुक सेन्टर, फोर्ट (फोन:२२८५१२४३)

मेजस्टिक एजन्सीज, विले पार्ले (पू) (फोन: २६१३२८७९)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, डोंबिवलि (पू) (फोन: ०२५१–२८६–१८९०/२४४–९५८५)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, गोरेगाव (प) (फोन: २८७६७२९८)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, माटुंगा (फोन: २४१२२३१६, २४१४१३४४)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, नवी मुंबई (फोन:३२५२२४९१)

**पुणे:** संस्कृती प्रकाशन, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४९७३४३)

द इंटरनॅशनल बुक सर्विस, डेक्कन जिमखाना (फोन: २५६७७४०५)

द वर्ड बुक शॉप, कँप (फोन: २६१३३११८, ३०५८००१०/११, ९३७०६७८११३/४)

उज्वल ग्रंथ भंडार, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४५६९०८, ६५२२६१३७)

यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ (फोन:२४४७०५३३)

**नागपुर:** दिलीप बुक एजन्सी, मेडिकल चौक (फोन: ६५९५०३२)

RNI. No. KARMAR/2008/27314 Registered Postal Regn. No. L/CNA/68/2010-11
Date of posting Newsletter-25th of Every Month. Posted at Bangalore GPO No. of Pages-8



गुरुजी कृष्णानंद (१९३९)

## मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

### मानसा

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

"मानसी" नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र इथे तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

### अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

### स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

### ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

### भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

### अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा. ८०-जी अंतर्गत आयकरात सूट मिळेल.

# आध्यात्मिक अनुभव

(संकलन: शोभा राव, अनुवाद: गुरुराज कानाडे)

महर्षी अमरांच्या जयंती दिवशी तपोनगरात ध्यान करताना, मला दोन वेगवेगळ्या प्रकारची जाणीव होती, ह्याचे मला नवल वाटले. एका जाणिवेप्रमाणे मी ध्यानवर्गात उपस्थित होते तर त्याचवेळी दुसऱ्या जाणिवेप्रमाणे मी ध्यानवर्गात उपस्थित नव्हते. बऱ्याच लोकांनी भाषण केले, पण ते काय बोलत होते ते मला उमगत नव्हते. मला वाटले की गुरुजी पारदर्शक आहेत, फक्त प्रकाशरूप आहेत आणि ते ध्यानवर्गात नाहीत आणि तरीही ते तिथे उपस्थित आहेत. हा चक्क विरोधाभास होता.

प्रकाश प्रवहनाच्या प्रत्येक सत्रानंतर माझ्या अंतरंगात एक प्रकारचा उद्रेक होतो ज्याची परिणती अत्यानंदाच्या लक्षावधी छटांमध्ये होते. विशेष काही कारण नसताना असे घडते. मला असे वाटते की शाळकरी मुलांनी केलेल्या प्रकाश प्रवहनाचा हा प्रभाव असावा.

–प्रगती राज

महर्षी अमरांच्या जयंती दिवशी दुपारी मला एकाएकी सभोवतालचे वातावरण पहाटेचे असल्यासारखे जाणवू लागले आणि त्यावेळी ज्या विशेष शक्ती येत होत्या त्या देखील पहाटेच्या वेळेस येणाऱ्या शक्ती वाटत होत्या. त्या शक्ती प्रेमाने ओतप्रोत भरलेल्या होत्या. मी त्या शक्ती ग्रहण केल्या व त्या प्रवाहित करू लागले. काही वेळाने मला वाटले की संपूर्ण हॉल त्या शक्तींनी भरून गेला आहे. हा एक सुखद अनुभव होता. मला वाटले की त्या शक्ती नवयुगाकडून येत आहेत व जणूकाही नवयुगाच्या आगमनाचे संकेत देत आहेत.

–किरणमयी

माझा छाया-पुरुष एका चबुतऱ्यावर बसून मला प्रशिक्षण देत होता. तो अतिशय प्रेमळ आणि तेजस्वी आहे. त्याच्याकडे विलक्षण नेतृत्व गुण आहेत. तो निश्चितच खूप शिस्तप्रिय व कडक आहे आणि त्याचे लक्ष कामावर केंद्रित असते ! शेवटी माझ्यात प्रवेश करण्यापूर्वी, स्वत:चा भरपूर प्रकाश त्याने माझ्याकडे प्रवाहित केला. आता माझे शरीर आणि मन पिसासारखे हलके झाल्यासारखे वाटते, शांत वाटते, रिक्त व स्वच्छ झाल्यासारखे वाटते, जणू माझ्यासाठी संपूर्ण मार्ग स्पष्ट व स्वच्छ करण्यात आला आहे. हा मार्ग विश्वास व निस्वार्थावर आधारित आहे. यापूर्वी कधीच मला इतके छान वाटले नव्हते व इतका आत्मविश्वास जाणवला नव्हता.

–विद्या विश्वामित्र

मी फक्त त्या वर्तमान क्षणास शरण गेले व ध्यानाचा आनंद घेतला. मी अंतरंगाच्या अतिशय खोल पातळीवर गेले व गुरुजी नेहमी ज्या रिक्ततेचा उल्लेख करतात, त्या रिक्ततेचा अनुभव घेतला. सगळ्या बाजूंनी शक्तीच्या झोतांनी माझ्यात प्रवेश केला व मी माझ्या अंतरंगात सामावून गेले. मला विस्तीर्ण झाल्यासारखे वाटले.

–नेहा रजनाला

१६ फेब्रुवारीला ध्यान करताना विचारांच्या गर्दीमुळे माझे ध्यान नीट लागत नव्हते. मी गुरुजींशी मानसिक संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. लगेचच खूप मोठ्या पांढऱ्या प्रकाशाने मला वेढले. शांतीच्या लाटा माझ्याकडे येत होत्या आणि माझे मन निर्विचार झाले. बाहेरच्या आवाजाचे मला भान राहिले नाही. साधारणपणे १५ मिनिटे मी त्या अवस्थेत होते आणि मला त्यातून बाहेरच पडावेसे वाटत नव्हते.

दि. २१ जानेवारी रोजी ध्यान करताना माझ्या निदर्शनास आले की, मी व्यास महर्षींशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करीत होते. माझा आत्मा माझ्या शरीरातून बाहेर पडला. आणखी एक आत्मा माझे मार्गदर्शन करण्यासाठी आला व तो मला आकाशात घेऊन गेला व मी परतेपर्यंत माझ्या सोबत होता. मी माझ्या आत्म्याला एखाद्या ताऱ्याप्रमाणे आकाशात पाहिले. त्यावेळी मला माझ्या हृदयाच्या स्पंदनांची जाणीव होती. मी माझ्या शरीरात परतले. ह्या अनुभवानंतर मी खूप आनंदी होते.

–चारुशीला बिराजदार

माझ्या आयुष्याच्या काही अध:पातांमुळे काही दिवसांपूर्वी मी खिन्न झालो होतो. स्वत:ला हील करण्यासाठी मी ध्यान करण्यास सुरुवात केली आणि एका प्रखर प्रकाशास माझ्यात प्रवेश करताना पाहिले. मला बरे वाटत नाही असे मी त्या शुभ्र प्रकाशास सांगितले. मी लगेच बरा झालो. मला आता निवांत, सकारात्मक, उत्साही व कणखर असल्यासारखे वाटते. मी अतिशय आनंदी आहे व गुरुजींचा आभारी आहे.

–संदीप पालके

माझ्या एका खूप चांगल्या मित्राच्या हृदयाचे दूसरे ऑपरेशन होणार होते. त्याला मी हीलिंग शक्ती पाठवत होते. मी त्याच्या पत्नीस, अगदी निर्मळ मनाने प्रकाशाला विनंती करण्यास व पतीच्या शरीरात दिव्य प्रकाश भरलेला आहे अशी कल्पना करण्यास सांगितले. तिने माझा सल्ला ऐकला. शस्त्रक्रियेपूर्वी डॉक्टरांनी तिला बोलावून टी.व्ही वर दाखविले व म्हणाले, " बघ हा चमत्कार! तुझ्या पतीच्या हृदयाच्या मुख्य धमनीत कोणतेच अडथळे नाहीत." आता तिचा प्रकाशावर पूर्ण विश्वास बसला आहे आणि ती प्रकाशाचे प्रवहन करू इच्छीत आहे.

–हिला माझदा

PRAKASHMARG A Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 200/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077 and
Printed at M/s. ART PRINT, Dr. Modi Hospital Main, WOC Road, Bangalore-86. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077.
Editor : Jayant Deshpande